# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
## ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३
## कार्यपत्रिका क्र. ९
## सभावृत्तांत

दिनांक :- २६/११/२०१५ वेळ :- दु. १२.१५ वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दिनांक २६/११/२०१५ रोजी दु. १२.१५ वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा. ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव - अध्यक्ष

२. मा.शमीम पठाण

३. मा.चिंचवडेपाटील आश्विनी गजानन

४. मा.शिंदे शितल उर्फ विजय गोरख

५. मा.गावडे जयश्री वसंत

६. मा.जगताप विमलताई सुरेश

७. मा.बारणे निलेश हिरामण

८. मा.झामाबाई बाळासाहेब बारणे

९. मा.ओव्हाळ शेखर अशोक

१०. मा.पवार यमुनाताई रमणनाना

११. मा.गायकवाड विनय उर्फ विनायक रमेश

१२. मा.कलाटे स्वाती मयूर

१३. मा.लुणावत शरद माणिकचंद स्वीकृत सदस्य

खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा.रविंद्र जाधव प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा, मा.रामदास तांबे – कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.गटटुवार - कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग, मा.शशिकांत मोरे, कार्यकारी अभियंता, विदयुत, मा.सी.एन.धानोरकर – उपअभियंता, स्थापत्य , मा.सी.बी.कोंडे – उपअभियंता, स्थापत्य, मा.एन.आर.निंबाळकर – उपअभियंता स्थापत्य, मा.संध्या वाघ, उपअभियंता , स्थापत्य, मा.ए.बी.पाटील - उपअभियंता, विदयुत विभाग, मा.ग्वालवंशी एस.जे.- प्र.उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.मिनानाथ इनामदार – लेखाधिकारी, श्री.के.डी.दरवडे, सहा.आरोग्याधिकारी, श्री.वामन बाबुराव नेमाणे – कार्यालयीन अधिक्षक (अतिक्रमण पथक प्रमुख) ब क्षेत्रीय कार्यालय इत्यादी.

सर्वप्रथम मा. सभाध्यक्ष ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात केली.

अ) तदनंतर मागील कार्यपत्रिका क्र. ८, दि. २१/१०/२०१५ रोजी झालेल्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.अध्यक्ष यांनी प्रकट केले.

तदनंतर **उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय**

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्रमांक २ चिंचवड प्रभाग क्रमांक २२ श्री मोरया गोसावी मंदिर व धनेश्वर पुल ते थेरगांव पुल पवना नदीलगतचा परीसर शासन धोरणानुसार प्लॉस्टीक मुक्त करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.आश्विनी चिंचवडेपाटील यांचा प्रस्ताव

विषय क्रमांक ३ महासाधु श्री मोरया गोसावी यांचे कार्यकालातील जीवनचरीत्रावर आधारीत म्युरल्स पार्वती उदयानामध्ये बसविण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.आश्विनी चिंचवडेपाटील याचा प्रस्ताव

विषय क्रमांक ४ वाकड डांगेचौक ते कस्पटेवस्ती स.नं.२०६ (जंम्बो किंग ते शेख वस्ती) रस्त्याला कै.रामभाऊ कलाटे मार्ग, उत्कर्ष चौक असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.स्वाती कलाटे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक. ५ वाकड येथील सर्व्हे नं.१६६/६ मधील चौकाला कै.आबाजी कलाटे चौक असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.स्वाती कलाटे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ६ वाकड येथील सर्व्हे नं.१६६/२/२ मधील चौकाला कै.मल्हारी कलाटे ईडन चौक असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.स्वाती कलाटे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ७ प्रभाग क्रमांक ५२ मध्ये नामफलक / बोर्ड बसविण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.यमुनाताई पवार यांचा प्रस्ताव.

ठराव क्र. ५६ — विषय क्र. १

दि. २६/११/२०१५ — विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा. निलेश बारणे — अनुमोदक: मा. स्वाती कलाटे

संदर्भ :- मा. माया संतोष बारणे यांचा दिनांक २०/११/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

विषय :- प्रभाग क्रमाक ५१ गणेशनगर – बेलठिकानगर थेरगांव परिसरातील पंचशिल कॉलनी क्रमांक १ डॉ.बाबासाहेब आंबेडकर पथ, २. पंचशिल कॉलनी क्रमांक २ ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पथ, ३. समर्थ कॉलनी गणेशनगर, थेरगांव, ४. मयुरबाग कॉलनी गणेशनगर, वाकडरोड, थेरगांव या रस्त्यांचे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.माया संतोष बारणे यांचा प्रस्ताव

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ५७ — विषय क्र. २

दि. २६/११/२०१५ — विभाग – १. आरोग्य मुख्य कार्यालय
२.पर्यावरण व अभियांत्रीकी विभाग
३. आरोग्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा. आश्विनी गजानन चिंचवडेपाटील — अनुमोदक: मा. ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव

संदर्भ :- मा. आश्विनी गजानन चिंचवडेपाटील यांचा दि. २६/११/२०१५ रोजीचा प्रस्ताव

चिंचवड प्रभाग क्रमांक २२ मध्ये महासाधू श्री मोरया गोसावी मदिर परीसर व धनेश्वर पुल ते थेरगांव पुल दरम्यानचा पवना नदीकाठचा परीसर शासनाच्या धोरणाला अनुसरुन प्लास्टीक मुक्त करण्यात

यावा. जेणेकरुन नदीप्रदुषण होणार नाही व मंदिराचा परिसर स्वच्छ व सुंदर राहण्यास मदत होईल. सबब सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे..

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ५८ विषय क्र. ३

दि. २६/११/२०१५ विभाग – १.स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

२. विदयुत ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा. आश्विनी गजानन चिंचवडेपाटील अनुमोदक: मा. ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव

संदर्भ :- मा. आश्विनी गजानन चिंचवडेपाटील यांचा दि. २६/११/२०१५ रोजीचा प्रस्ताव

चिंचवड प्रभाग क्रमांक २२ मध्ये महासाधू श्री मोरया गोसावी मंदिरालगत पार्वती उदयानामध्ये महासाधू श्री मोरया गोसावी यांचे कार्यकालातील जीवन चरीत्रावर आधारीत म्युरल्स उभारण्याबाबत असंख्य भाविक – भक्तांची मागणी आहे. सबब पार्वती उदयानामध्ये १० म्युरल्स उभारण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे..

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ५९ विषय क्र. ४

दि. २६/११/२०१५ विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा. स्वाती कलाटे अनुमोदक: मा.विनय गायकवाड

संदर्भ :- मा. स्वाती कलाटे यांचा दि.२६/११/२०१५ रोजीचा प्रस्ताव..

वाकड डांगेचौक ते कस्पटेवस्ती स.नं.२०६ (जंम्बो किंग ते शेख वस्ती) रस्त्याला कै.रामभाऊ कलाटे मार्ग, उत्कर्ष चौक असे नामकरण *करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणत येत आहे.*

*सदरचा ठराव सर्वा*नुमते मान्य झाला.

ठराव क्र. ६० विषय क्र. ५

दि. २६/११/२०१५ विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.स्वाती कलाटे अनुमोदक: मा.विनय गायकवाड

संदर्भ :- मा.स्वाती कलाटे यांचा दिनांक २६/११/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

वाकड येथील सर्व्हे नंबर १६६/६ मधील चौकाला कै.आबाजी कलाटे चौक असे नांव देणेकामीच्या पस्तावास मान्यता देणेत येत आहे..

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ६१ विषय क्र. ६

दि. २६/११/२०१५ विभाग – .स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा. स्वाती कलाटे अनुमोदक: मा. विनय गायकवाड

संदर्भ :- मा. स्वाती कलाटे यांचा दि.२६/११/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

वाकड येथील सव्र्हे नं.१६६/२/२ मधील चौकाला कै.मल्हारी कलाटे ईडन चौक असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे..

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ६२ विषय क्र. ७

दि. २६/११/२०१५ विभाग – .स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.यमुनाताई पवार अनुमोदक: मा. शेखर ओव्हाळ

संदर्भ :- मा.यमुनाताई पवार यांचा दि.२६/११/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ५२ ताथवडे-पुनावळे असून, सदर प्रभागातील नागरीकांच्या मागणीनुसार १) स्वामी विवेकानंद नगर-२, २) स्वमी विवेकानंदनगर-३ ३) स्वामी विवेकानंद नगर – ४, ४) स्वामी विवेकानंद नगर – ५, ५) शुभदा कॉलनी ६) ज्ञानदा कॉलनी (संख्या २ बोर्ड), ७) सुखदा कॉलनी ८) गजानन कॉलनी , ९) लिलाई पार्ले १०) लोंढे वस्ती-२, ११) पंचशील नगर १२) नृसिंह कॉलनी अशी कॉलनीची नांवे असून, या प्रमाणे नामफलक बोर्ड बसविणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा. ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
[ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/ २०७ /२०१५.
दिनांक : १६ /१२ /२०१५

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना